देहुरोड पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड
पत्ता जुना पुणे मुंबई रस्ता सेंट्रल चौक,देहुरोड
दुरध्वनी क्र. ०२० २७६७१२८८ पिन कोड-४१२००१
Email Id Psdehuroad.pcpc-mh@gov.in

प्रेस नोट दिनांक ०८/०५/२०२३

मा.पोलीस उप-आयुक्त सो परि.२

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,अंतर्गत देहुरोड पोलीसांची कामगिरी

## "अपहृत बालकांचा २४ तासामध्ये शोध घेवुन त्याचे पालकांचे ताब्यात सुखरुप दिले"
## देहुरोड पोलीस तपास पथकाची कामगिरी.

देहुरोड पोलीस स्टेशन येथे दि.०७/०५/२०२३ रोजी सकाळी ०६/०० वा.च्या दरम्यान दोन लहान मुलांचे अपहरण झाले आहे असे मुलांचे पालक यांनी फिर्याद दिल्याने देहुरोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.२७७/२०२३ भादंविक ३६३ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.त्यानंतर सदर ठिकाणी मा.पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांनी दाखल गुन्हयातील बालके ही ०६ वर्षे व ०८ वर्षाची असल्याने सदरचे प्रकरण गांर्भीयाने घेवुन मा.पोलीस उप-आयुक्त सो डॉ.काकासाहेब डोळे,सहा पोलीस आयुक्त श्री पद्माकर घनवट भेट दिली व त्यांनी दाखल गुन्हयातील बालके अल्पवयीन असल्याने पोलीस स्टेशनकडील विविध पथके तयार करण्याची आदेश दिले. मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे यांनी गुन्हे शाखेकडील विविध पथके तयार करण्याचे आदेश दिले. त्यानुसार विविध पथके तयार करुन सर्व पथके बस स्टॅन्ड चेक करणे,रेल्वे स्टेशन चेक करणे,मंदीरे चेक करणेकामी रवाना केली.मा.पोलीस उप-आयुक्त सो डॉ.काकासाहेब डोळे,सहा पोलीस आयुक्त श्री पद्माकर घनवट यांनी दिलेल्यास सुचनेप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.ज्ञानेश्वर साबळे यांनी देहुरोड पोलीस स्टेशन कडील तपास पथक अधिकारी व अंमलदार यांना लागलीच मुलांचा शोध घेण्यासाठी पुणे रेल्वे स्टेशन येथे रवाना केले.त्यानुसार देहुरोड पोलीस स्टेशनकडील तपास पथकांने पुणे रेल्वे स्टेशन येथे जावुन शोध घेत असताना त्यांना गोपनीय बातमीदाराकडुन माहीती मिळाली की पुणे रेल्वे स्टेशन येथुन ०२ मुले ही साथी फांऊडेशन यांनी ताब्यात घेतली आहेत. असे समजल्याने तपास पथकातील स्टाफने साथी फांऊडेशन येरवडा,पुणे येथील रेखा गायकवाड मॅडम यांना संपर्क करुन त्यांना त्याची माहीती देवुन त्याच्याकडुन सदर मुलांचे फोटो प्राप्त केले असता सदर मुलेही देहुरोड पोलीस स्टेशनकडील दाखल गुन्हयातील अपहृत मुले असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे सदर बालकांना साथी फांऊडेशन यांच्या ताब्यातुन घेवुन त्यांना त्यांचे आई वडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे.देहुरोड पोलीस स्टेशनकडुन सदर अपहृत बालकांचा २४ तासांच्या आत शोध घेण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड श्री विनय चौबे सो,मा.सह पोलीस आयुक्त सो,श्री.डॉ.संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी सो,मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ २,डॉ.काकासाहेब डोळे,पोलीस उप-आयुक्त(गुन्हे) स्वप्ना गोरे,मा.सहा पोलीस आयुक्त,देहुरोड विभाग श्री.पद्माकर घनवट,यांचे मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.ज्ञानेश्वर साबळे,मा.दिंगबर सुर्यवंशी पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि श्री.दिंगबर अतिग्रे,सहा पोलीस निरीक्षक योगेश गायकवाड,पोलीस उप-निरीक्षक श्री वैभव पाटील,पोलीस उप-निरीक्षक श्री संदीप बोरकर,पो हवा ५४९ सामील प्रकाश,पो.शि २५०५ शेजाळ,पो शि २९०० कानगुडे,पो शि २४५० माने,पो शि भिसे,पो शि बावनकर यांनी केली आहे.

**डॉ.काकासाहेब डोळे**
**पोलीस उप-आयुक्त परिमंडळ २**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**

Scanned with OKEN Scanner